राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१
तक्रार क्र. १०९०/२०१८
(द्वितीय अपील क्र. ५२५७/२०१७ मध्ये )

श्री. सदावर्ते आप्पासाहेब सर्जेराव ,
रा. माळतोंडी ता. मंठा ,
जि. जालना
: अर्जदार

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी ,
पंचायत समिती, मंठा
ता. मंठा जि. जालना
: उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा ,
गटविकास अधिकारी ,
पंचायत समिती, मंठा
ता. मंठा जि. जालना
: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २९.०६.२०२१)
निर्णय

अर्जदार यांनी दि. ९.१०.२०१८ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील क्र. ५२५७/२०१७ मध्ये आयोगाने दि. १८.४.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे सदर तक्रार प्रकरणाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अर्जदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे (नोंदणीकृत टपालाद्वारे) कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना

त्यांचे लेखी म्हणणे ई - मेल संदेशाव्दारे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सदर प्रकरणात गुगल मीट ॲपव्दारे सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अर्जदार व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अर्जदाराने आयोगासमोर कथन केले की, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रकरणी आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, आयोगाने द्वितीय अपील क्र. ५२५७/२०१७ मध्ये आयोगाने दि.१८.४.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्या बाबतचा कोणताही पुरावा आयोगाच्या पत्नावर दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात आयोगाने आदेशाद्वारे, संबंधित जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास आवश्यक असलेली माहिती नोंदणीकृत टपालावरे उपलब्ध करुन देणेबाबत आदेशित केलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाचे अनुपालन केले नसल्यामुळे अर्जदार यांनी आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता आयोगातर्फे संधी देण्यात आली. मात्र, आयोगाकडील निर्णयाच्या अनुषंगाने अनुपालन केले असल्याबाबतचा कोणताही पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकलेले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या उल्लंघन करणाऱ्या ठरतात. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा सर्व कृती अनुसरुन अधिनियमातील कलम २० (१) नुसार करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी पंचायत समिती, मंठा जि. जालना यांना या प्रकरणी रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, वर नमूद केल्याप्रमाणे जबाबदार जन माहिती अधिकारी यांची नावे निश्चित करुन त्यांचेकडुन शास्तीची रक्कम संबंधिताच्या वेतनातुन वसूल करुन ती खालील लेखा शिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) व कलम १९ (७) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

लेखाशिर्ष :- ००७० - इतर प्रशासनिक सेवा

:- ६० - इतर सेवा

:- ८०० - इतर जमा रक्कम

:- १८ - माहिती अधिकार ००७०-००६-१

वर नमूद केल्याप्रमाणे शास्तीची वसुली करण्यात आल्यानंतर त्या संदर्भातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी आयोगाकडे सादर करावा.

प्रस्तुत प्रकरणात, अर्जदार यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती आयोगाने आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. ही गंभीर बाब आहे. अशा परिस्थितीत आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे निर्णयाचे अनुपालन होईल, ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी व्यक्तिशः पहावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

उपरोक्त निर्देशासह विचाराधिन तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ज. धारुरकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. 385 दि. 24/1/2022

प्रत :- माहिती तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना